आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।


**महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा)औरंगाबाद, महाराष्ट्र**

School Leadership Academy

Maharashtra


## मोड्यूल क्र.५

# महाराष्ट्रातील सातपुडयाच्या पायथ्याशी वसलेल्या फासेपारधी बहुल भागात जीवनकौशल्य रुजवणुकीत शालेय नेतृत्वाची भूमिका

# Role of School Leadership in Inseminating Life Skills in Fasepardhi Dominated areas at the Foot of Satpuda in Maharashtra.



सातपुड्याच्या पायथ्याशी वास्तव्यास असलेला फासेपारधी समाज

**प्रस्तावना :-** 'एखादं मुल सात वर्षे तुम्ही माझ्याकडे सोपवा, त्यानंतर ते मूल परमेश्वर वा कुणीही नेले, तरी ते त्या मुलाला बदलवू शकत नाहीत'. पेस्टालॉझी नावाच्या ग्रीक शिक्षकाचे हे उदगार. माजी राष्ट्रपती डॉक्टर अब्दुल कलाम

शाळांविषयी म्हणतात, ‘शाळांनी फक्त शैक्षणिक केंद्रे असून चालणार नाही, तर शाळा ज्ञान व कौशल्याची केंद्रे व्हाव्यात’. प्रस्तुत दोन्ही उदगार बालकांची सुरुवातीची वर्षे किती महत्त्वाची असतात याची सत्यता पटवून देतात. खरेतर शिक्षणातून माणूस घडण्याचा प्रवास होणे अपेक्षित आहे. हा प्रवास मूल्ये आणि जीवन कौशल्यांच्या रुजवणुकीतून शक्य होतो. देशाचा यशस्वी, सुजाण नागरिक होण्यासाठी, वैयक्तिक व सामाजिक जीवन उत्तम जगण्यासाठी मानवी जीवनात जीवन कौशल्येच उपयुक्त असतात.

सध्याच्या धावत्या जीवनशैलीमुळे कुटुंबात मुलांना एकमेकांचा सहवास कमी मिळतो. याचा थेट परिणाम मुलांच्या भावनिक, मानसिक जडणघडणीवर होताना दिसतो. समाजातून शिक्षणाविषयी ही अपेक्षा ऐकायला मिळते की, शिक्षणाचा दर्जा खूप चांगला असायला हवा. मुळात शिक्षण म्हणजे आत्मोद्धार! आपल्या महाराष्ट्र राज्याने याचे भान ठेवून मूल्ये, जीवन कौशल्यांचे शिक्षण अभ्यासक्रमातून दिले आहे. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातून प्रत्येक मूल शाळेत येत आहे. म्हणूनच शिक्षणात अध्ययनकर्ता समाज, सर्वांसाठी शिक्षण, आजन्म शिक्षण या संकल्पना मान्य झाल्या आहेत. या मोडयूल मध्ये आपण प्राथमिक शिक्षणात फासेपारधी बहुल भागात जीवन कौशल्यांची रुजवणूक करणाऱ्या एका यशस्वी शालेय नेतृत्वाची चळवळ जाणून घेणार आहोत ज्यातून विद्यार्थ्यांच्या मानसिक व भावनिक सुदृढता, क्षमता, कौशल्यांसह समाज विकसनाच्या वाटा आपणास धुंडाळता येणार आहेत.

**• मोडयूल अध्ययनाची उद्दीष्टे -**

1) फासेपारधी बहुल भागातील शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.

2) फासेपारधी बहुल भागात विद्यार्थ्यांमध्ये जीवनकौशल्ये रुजविण्यासाठी केलेल्या यशस्वी प्रयत्नांना समजून घेण्यासाठी शालेय नेतृत्वाचे कार्य समजून घेणे.

3) जीवनकौशल्ये रुजविण्यासाठी शालेय नेतृत्वाचा योग्य दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करणे.

**• फासेपारधी बहुल भागातील शालेय नेतृत्व संकल्पना -**


आदिवासी, फासेपारधी बांधव डोंगर - दऱ्यांमध्ये वास्तव्य करतात. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी दुर्गम भागात दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध नसताना सर्व शिक्षण मोहीम अंतर्गत शिक्षणाची सोय झालेली आहे. अशा दुर्गम भागात शाळेत शिकवीत असलेले शिक्षक, मुख्याध्यापक तसेच त्यांना प्रशासकीय व शैक्षणिक मदत करणारे क्षेत्रीय अधिकारी म्हणजेच फासेपारधी बहुल भागातील शालेय नेतृत्व. या दुर्गम भागात शिक्षक, मुख्याध्यापक Leader by position पेक्षा Leader by action चा प्रत्यक्ष उपयोग करीत शाळा आणि समाजाची नाळ घट्ट वीणताना दिसतात. आव्हानात्मक परिस्थितीला सकारात्मक प्रतिसाद देणाऱ्या शालेय नेतृत्वाला सलाम करीत प्रस्तुत मोड्यूल आपण अभ्यासणार आहोत.

**• शिक्षणामध्ये जीवन कौशल्यांचा समावेश कशासाठी करावा?**

जीवनात प्रत्येक व्यक्तीला संकटांचा सामना करण्यासाठी संतुलित वर्तनाची गरज भासते. व्यक्तीच्या समज आणि ज्ञानातून संतुलित वर्तन, क्षमता विकसित होत असते. क्षमतांची प्राप्ती स्वभाव स्थितीवर अवलंबून असते. स्वभावाचा सहसंबंध भावनेशी असतो. भावना सकारात्मक वा नकारात्मक असतात. अपयशाने खचण्यापेक्षा भावनांवर नियंत्रण ठेवणे आणि काही नकारात्मक भावना नाहीशा करण्याची गरज असते म्हणून शिक्षणात भावनिक बुद्ध्यंकाला महत्त्व देण्यात आले आहे. या दृष्टीने जागतिक आरोग्य संघटनेने 1997 मध्ये दहा मूलभूत जीवन कौशल्ये

निश्चित केली होती, ज्या आधारे आपली शक्ती व क्षमतांचा वापर करून दैनंदिन समस्या सोडवून जीवनात सकारात्मकतेकडे वळणे अपेक्षित होते.

**जागतिक आरोग्य संघटनेने निश्चित केलेल्या जीवनकौशल्यांचे वर्गीकरण दर्शक**




**(स्त्रोत:- WHO 1997)**

वरील सर्व बाबींचे महत्त्व लक्षात घेऊन राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (2005), राज्य अभ्यासक्रम आराखडा (2010), ज्ञानरचनावादी शिक्षण, भारतीय संविधान, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - 2020 मध्ये यांमध्ये व्यक्त केलेल्या अपेक्षांनुसार अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन, मूल्यमापनातून जीवन कौशल्ये रुजविणे अपेक्षित आहेत. मात्र प्रचंड स्पर्धेच्या आजच्या युगात समाजात चंगळवादा बरोबर, बदलत्या सामाजिक मूल्यांमुळे अस्वस्थता दिसून येते. हिंसक प्रवृत्ती, व्यसनाधीनता, नकारात्मक विचार यातून विद्यार्थ्यांमध्ये आत्महत्या करण्याचे प्रमाण आढळून येते. या मोडयूलमध्ये आपण फासेपारधी बहुल भागातील विद्यार्थ्यांचा विचार करतो आहोत, ज्यांना आजही शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

- **महाराष्ट्रातील शिक्षणातून जीवनकौशल्ये रुजवणुकीसाठी झालेले प्रयत्न -**

जीवन कौशल्यांच्या जाणीवपूर्वक रुजवणुकीसाठी महाराष्ट्रातील ठाणे, सोलापूर, धुळे, सातारा, जालना, लातूर, यवतमाळ, चंद्रपूर अशा आठ जिल्ह्यांमध्ये वर्ष 2011 मध्ये प्रत्येकी 2 केंद्रशाळांतील एकूण 185 शाळांमध्ये जीवन कौशल्ये प्रशिक्षण प्रायोगिक तत्त्वांवर दिले गेले. जीवन कौशल्यांवर आधारित काही पाठ तयार करून, महानगरपालिका, जिल्हा परिषद व काही खासगी शाळांमध्ये ते घेण्यात येऊन त्यांची यशस्विता आजमावण्यात आली होती.

- **फासेपारधी बहुल भागातील स्थिती व जीवनकौशल्ये रुजवणुकीतील आव्हाने-**

उत्तर महाराष्ट्रातील सातपुडयाच्या पायथ्याशी जळगाव, धुळे व विदर्भातील बुलडाणा जिल्ह्यात फासेपारधी लोक वस्ती करून राहतात. या भागातील फासेपारधी समाज लाव्हरी किंवा तितर पक्षी पकडतात. मुक्ताईनगरच्या कुऱ्हा काकोडा भागातील फासेपारधी समाज, चारधाम यात्रांसाठी आठ महिने स्थलांतरित असतो. तेथे रुद्राक्ष, नागमणी

(काल्पनिक), धन प्राप्तीसाठी काळी हळद, दोन तोंडी साप, घुबड विकतात, ज्यांच्या किंमती लाखों रुपयांच्या घरात असतात असे चर्चेअंती समजले. पक्की घरे, कुस्ती आणि रेड्यांच्या झुंजी, सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग, मंदिर उभारणी, आधुनिक पेहराव, जंगली औषधांचा वापर, दसरा व संक्रांत हे मुख्य सण अशी फासेपारधी समाजाची निरीक्षणाअंती जाणवलेली वैशिष्ट्ये आहेत. तथापि गावातील अस्वच्छता, शौचासाठी पाण्याऐवजी कपड्यांचा वापर, अंधश्रद्धा, शिक्षणाविषयी अनास्था, भाषेची अडचण, कष्ट करण्याची प्रवृत्ती कमी, पावरा समाजाकडून शेती करून घेणे, दहावी उत्तीर्ण तरुणांचे प्रमाण नगण्य अशा चिंता करण्यासारख्या गोष्टी जाणवल्या.

**• शिक्षित गावांची स्थिती आणि जीवन कौशल्ये रुजवणुकीसाठी आव्हाने-**

कुऱ्हा - काकोडा गावातील काही भागांमध्ये शिक्षणाचे प्रमाण चांगले आहे परंतु गावात गटतट, ग्रामपंचायत निवडणुकांमधील वाद, सांस्कृतिक - सामाजिक ऐक्य नाही, शेती व शेतमजुरी चे प्रमाण जास्त अशी परिस्थिती लक्षात आली.वरील दोन्ही स्थितींमध्ये आदिवासी समाज अंधानुकरण करताना दिसतो तर शिक्षित गावात शिक्षणाने विचार परिवर्तन दिसत नाही. यासाठी शाळा गावात जाणे आणि गाव शाळेत येणे नितांत गरजेचे वाटते.

**शिक्षक यशोगाथा - जीवनकौशल्ये रूजवणुकीतील यशस्वी शालेय नेतृत्व**

**श्री.मंगेश ढेंगे - जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, भोटा ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव**



भोटा गाव परिसरात सातपुडा पर्वत रांगांतील डोंगराळ भाग

**- श्री.मंगेश ढेंगे - उपशिक्षक,जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, भोटा ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव**

आमच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेपासून तब्बल 125 किलोमीटर दूर एका ध्येयवेड्या शिक्षकांना भेटण्याचा प्रवास, अधिव्याख्याता शैलेश पाटील, जिल्हा गुणवत्ता कक्षाचे शिक्षक सदस्य मनोज लुल्हे सरांसमवेत सुरू झाला. रस्त्याने जाताना वडोदा अभयारण्याचे निसर्गरम्य वातावरण आल्हाददायक वाटत होते. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा भोटा, सातपुडा पर्वतरांगा पासून दहा किलोमीटर अंतरावर होती. शाळेला प्रयोगभूमी मानणारे हे गुरुजी 24 जुलै 2010 ला स्वत:च्या गावाजवळील भोटा शाळेत रुजू झाले. नोकरी ही औपचारिकता नसून ती आनंदाचे निधान व सर्जनशीलतेची प्रयोगशाळा असावी अशी प्रबळ इच्छाशक्ती व आत्मविश्वास त्यांच्या सोबतीला होता. या शाळेचे वेगळेपण म्हणजे शाळेचे मुख्याध्यापक भगवान जाधव, अनंत पाटील, नितीन बागुल यांची टिम. मुलांना वर्गात पारंपरिक पद्धतीने अध्यापन करीत, जीव तोडून शिकविल्यावर **Quality Outcomes** येत नाही म्हणून मंगेश ढेंगे सर अस्वस्थ व्हायचे. पाच वर्षांनी (2015 मध्ये) सुट्ट्यांमध्ये ते वर्धा येथील सेवाग्राम आश्रमात एक आठवडा राहिले. तिथे आनंद निकेतन ही गांधीजींनी सुरू केलेली शाळा **नई तालीम** विचारांवर मुलांना जीवन शिक्षण देते ते अनुभवले. गांधीजी, विनोबा, जे. कृष्णमूर्ती, गिजुभाई यांच्या शिक्षण विचारांच्या सखोल अभ्यासाअंती त्यांनी पुढच्या शैक्षणिक प्रयोगांचा विचार केला. शाळेत विद्यार्थ्यांना स्व ची जाणीव, श्रमाची आवड,

विवेकवादाची वाढ, चिकित्सक विचार इ. उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून जीवन शिक्षण देणारे प्रयोग सुरू केले. स्वत:च स्वत:चे कठोर समीक्षक होऊन विश्लेषण केले. शाळा गावाला जोडण्यासाठी आणि गाव शाळेत आणण्यासाठी पहिले प्रथम पालकांचे व्हाट्सअप गृप स्थापन केले. या गृपवर सर्व शिक्षकांनी शेतीविषयक गप्पा केल्या. शाळेतील मुलांच्या पालकांकडे स्वावलंबी शेतीविषयी आग्रह धरला. हळूहळू मुलांची शाळेतील प्रगती ग्रुपवर दिली. शाळेतील वेगवेगळे कार्यक्रम, शैक्षणिक प्रयोग, समस्या, येणारे नवनवीन उपक्रम यांची चर्चा व्हायला लागली. पालकांनी त्या गटाचे नाव **'माझे गाव माझी शाळा'** असे ठेवले.

**• शाळेत उबंटू गार्डनची निर्मिती :**

गावात शेतीचे सुधारित प्रयोग सुरू केल्यावर शाळेत **मियावाकी** (जपानी) पद्धतीने वृक्षारोपण करून 30 चौरस मीटरमध्ये 60 झाडे लावली, ज्यात एकुण 18 देशी प्रजाती आहेत. या गार्डनचे प्रमुख सातवीच्या वर्गातील विद्यार्थी आहेत. मियावाकीत झाडांना नैसर्गिक आवरण, उसाचे पाचट, पालापाचोळा टाकतात व ते कुजले की कंपोस्ट खत मिळते. सोबत मुले जीवामृत तयार करून झाडांना देतात.

**Link-** https://bit.ly/3vfnOUx




मियावाकी जपानी पद्धतीने 'उबंटू' गार्डनची निर्मिती करतांना विद्यार्थी

आपल्या परिसरात रासायनिक शेतीमुळे आत्महत्या होतात म्हणून शाळेने सेंद्रिय शेतीचा प्रचार, प्रसार गावागावातून केला. या निमित्ताने सर्व शेती सुधार चळवळीत सामील झाले.ढेंगे सरांनी सहजपणे **परिसरातील घटकांशी समन्वय** साधून अडचणी व समस्यांवर मात करण्यासाठी पालकांना सक्षम करीत **उत्कृष्ट समन्वयकाची** भूमिका पार पाडली. सन 2011 मध्ये वर्गातील मुलांना घेऊन विद्यार्थ्यांद्वारे चालवली जाणारी **बँक** सुरू केली. **'बचत करा थोडी जीवनात येईल गोडी'** असे ब्रीद वाक्य असणाऱ्या बँकेचे वैशिष्ट्य म्हणजे द.सा.द.शे 6% दराने 2 महिन्यांनंतर व्याज, आर्थिक व्यवहाराचे मॅसेज, 20 रू.पासबुक फी, यात्रेत व्यवसायासाठी आठ दिवस मुदतीचे बिनव्याजी कर्ज, लकी ड्रॉ, बोनस ही होय. दर महिन्याच्या सभेत पुढील कार्यदिशा, खातेदारांच्या अडचणींचे निराकरण, संचालक - सभासद विवाद, कामातील सुधारणा यावर चर्चा होते. परिणामी लोकशाहीची मूल्ये मुलांमध्ये रुजतात. विशेष म्हणजे पासबुक लेखन, मोबाईल वरून पालकांना मेसेज पाठवणे, खाते नोंदवही, दैनिक नोंदवही, व्याज देणे, लकी ड्रॉ काढणे, मानधन जमा करणे, मासिक सभेच्या अहवालाचे लेखन, नफा जमा करणे, पासबुकांचा हिशोब करणे, बँकेचे अंकेक्षण

ही सर्व कामे विद्यार्थी करतात. यातून नकळत मुले आर्थिक स्वावलंबन शिकली. समस्या निराकरण, स्व ची जाणीव, निर्णयक्षमता, परिणामकारक संप्रेषण, आंतरव्यक्ती सहसंबंध, सर्जनशील विचार या जीवन कौशल्यांचे अर्थ मुलांना प्रत्यक्ष अनुभवातून उलगडले.

Link- https://cutt.ly/1zhy8Sp




मुलांच्या बालमित्र बचत बँकेचा कारभार

बँक ठोक दराने स्टेशनरी आणते जी **विद्यार्थी वस्तू भांडारातून** स्वस्त दराने विद्यार्थ्यांना विकली जाते. बँक या नफ्यातून शाळेतील विविध उपक्रमांचे प्रायोजकत्व स्वीकारून बक्षीस देऊन जाहिरातही करते. या कृतीमुळे मुलांचा स्वतः बद्दलचा आदर, स्वाभिमान, अधिक समाजाभिमुख वर्तन, नवीन कौशल्य शिकण्यासाठी सुधारित अध्ययन, वर्गात आणि वर्गाबाहेर सामाजिक जाणीव, जाहिरात लेखनाची क्षमता वाढली. **'सृजन' हस्तलिखित मासिक** विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी सुरू केले आहे. संपादक इयत्ता सातवीचे विद्यार्थी असून ते वाचकांशी हितगुज करतात. मासिकात विद्यार्थ्यांनी स्वतः लिहिलेल्या कविता, कथा, चारोळ्या, प्रसंग चित्र, आकृती, रांगोळ्या, शब्दसंग्रह वाढविण्यासाठी संवाद, पत्रलेखन, डायरीची पाने, जाहिरात यांचा समावेश असतो. बहुतांश मुले लेखनाच्या या विचारपीठावर अभिव्यक्त होतात. स्वतःहून शुद्धलेखन, व्याकरणाच्या नियमांची जिज्ञासेने चर्चा, लेखनातील नेमकेपणा, सुवाच्चपणा, मजकुराचा आकार, स्थान, आराखडा या बाबी ठरवितात. आता सृजन चा अंक विचारांनी परिपक्व झाला आहे. तो प्रकाशित झाल्यावर '**मानवता वाचनालय व युवा केंद्रात'** ठेवला जातो. मंगेश ढेंगे यांच्या सर्व टीमने या उपक्रमातून **नेतृत्वाला** आवश्यक असणारे **भावनिक वैचारिक संतुलन** सिद्ध केले आहे. 'मानवता वाचनालय व युवा केंद्र' अडीच हजार पुस्तकांचे ग्रंथालय! मुलांमध्ये विश्वस्त भावना रुजविण्यासाठी केलेला यशस्वी खटाटोप! या ग्रंथालयात चार विभाग असून तिसरी ते सातवीतील एकूण दहा विद्यार्थ्यांचे व्यवस्थापक मंडळ सर्व जबाबदारी सांभाळतात , ग्रंथालयाच्या भिंतीवर पुस्तकांची नावे, ग्रंथकारांचे तक्ते लावले आहेत. ग्रंथालयाची पहिली ते आठवीपर्यंत दोन रुपये व गावातील सदस्यांना पाच रुपये मासिक वर्गणी आहे. गावातील तरूण स्पर्धा परीक्षांसाठी पुस्तके नेतात. पुस्तकांची नोंद, देवघेव रजिस्टर, वर्गणी रजिस्टर, वर्गणी चा हिशोब करून, मुलेच शिक्क्यासह रक्कम शाळेच्या बँकेत ग्रंथालयाच्या खात्यात जमा करतात. विशेष म्हणजे ग्रंथालय आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहे. पुस्तकांची दुरुस्ती, स्टेशनरी, इतर किरकोळ खर्च व संचालकांचे दर महिन्याचे मानधन या वर्गणीतून दिले जाते.




मुलांचा सृजन अंक व मानवता वाचनालय व युवा केंद्र

Link- https://cutt.ly/izhulEY          Link- https://cutt.ly/SzhuEQQ

वरील सर्व उपक्रमांतून शाळेतील मुले कृती पूर्व अधिक चिंतन, अधिक विचार करून यशस्वी होताना दिसतात. परिणामी विद्यार्थ्यांमधील संबंध चांगले होऊन वर्गातील वातावरण शैक्षणिक दृष्ट्या अधिक सकारात्मक झाले. शिवाय वर्गातील हिंसा कमी होऊन इतरांच्या भावनांबद्दल संवेदनशीलता वाढीस लागली. शाळेच्या **सृजन यात्रेत** मुलांचे गट तयार केले. गावातील टाकाऊ वस्तूंपासून आकर्षक वस्तू तयार करून मुलांनी गावातील यात्रेत, बाजारात आणि शाळेतील शिक्षण परिषदेत त्यांची विक्री केली. यातून आपल्याला कमाई करता येते हा आत्मविश्वास मिळविला. परिणामी गावात छोटे उद्योजक तयार झाले. आता कुटुंबातील आर्थिक चणचण सोडविण्यासाठी मुलांनी गावात दोन पाणीपुरी, पापड, भाजीचे स्टॉल लावले आहेत. हे बाल उद्योजक शाळा सुटल्यावर दीड-दोन तास देऊन पंधराशे ते दोन हजार रुपये कमवून घरासाठी हातभार लावतात. श्रममूल्याची प्रतिष्ठा, विक्रीसाठी लागणारे कौशल्य, वस्तू विक्रीसाठी जाहिरातीच्या नवनवीन कल्पना, ग्राहकांशी करावा लागणारा संवाद व वागणूक यांचा विचार मुले करायला लागली आहेत. त्यांना **उबंटू** चा खरा अर्थ गवसला. शिक्षणातून भाकरी कमविण्याची क्षमता विकसित करणे, अनेकांना रोजगार देणारे उद्योजक घडविणे हा सृजन यात्रेचा प्रपंच!

**Link-** https://cutt.ly/CzhuAy3



शाळेत आयोजित केलेल्या सृजन यात्रेचे बोलके चित्र

याचा परिणाम मुले शाळेशी बांधली गेली. लैंगिक शिक्षणासारख्या संवेदनशील विषयावर शिक्षक व विद्यार्थी सकारात्मक चर्चा करतात. शाळेतील मुले ग्रामस्वच्छता, व्यसनमुक्ती यांवर घोषणा, चौकाचौकात पथनाट्य अशा कृती सादर करतात. परिणामी गावातील संघर्ष कमी झालेला दिसला. मुले गावकऱ्यांची लाडकी, तर शिक्षक लोकप्रिय झालेले लक्षात आले. अधिक निकोप व काळजी घेणाऱ्या वातावरणामुळे शाळेतील शिक्षक क्रमिक पुस्तकात अडकून न राहता ते मुलांच्या जीवनासाठी आणि भविष्यासाठी माध्यम बनले आहेत अस जाणवले.

वर्गातील अध्ययन - अध्यापन कृतीयुक्त असल्याने एकमेकांना समजून गटकार्यातून सहजपणे आणि आपल्या गतीने मुले शिकती होताना दिसली. मूलभूत क्षमता विकासानंतर पुढच्या पायऱ्या या शाळेचे विद्यार्थी वेगाने चढतात. मुलांनी चुकावे पण स्वतः करून बघावे आणि मगच शिकावे यावर विश्वास ठेवत परिपाठातून गाणी, चित्रपट दाखवून जीवन शिक्षणाचे पाठ मुलांसमोर ठेवले जातात. मुले स्पर्धेत हरतात, जिंकतात, पण खोटे बोलत नाहीत. कारण खिलाडू वृत्तीचा आणि सांघिक विजयाचा अनुभव, एकमेकांच्या गुणांची कदर करीत त्यांनी घेतलेला आहे. दीक्षाचे अप्रतिम डायरी लेखन आणि कलेक्टर होण्याची स्वप्नं वास्तवात उतरविण्यासाठी धडपड, शिवानीचे एकेकाळी मी तंबाखू खाल्ली होती याचा कबुली देऊन ढसाढसा रडणे, वैष्णवीने आपल्या मैत्रिणीला देवीच्या मंदिरात वेगळी वागणूक दिल्याचा राग येऊन व्यक्त केलेली नाराजी, साक्षीने क्रीडा स्पर्धेला बाजूला ठेवत दुसऱ्या शाळेतील मुलीला मासिक पाळी आल्यावर आपल्या बस भाड्याच्या पैशातून आणून दिलेला सॅनिटरी नॅपकिन, प्रणव आणि किशोर यांचे दर शनिवार-रविवारी शेतात आई-वडिलांसोबत कष्ट घेणे हे वर्तन बदला बदल आम्ही मुलांशी केलेल्या चर्चेतून अनुभवले.

Link- https://cutt.ly/WzhuXPP

**‘एक शिक्षक म्हणून स्वत: मधील विद्यार्थी व स्वत: मध्ये दडलेले मूल सदैव जिवंत आणि सक्रीय ठेवावे लागते. गेल्या सहा वर्षांतील माझ्या विविध प्रयोगात माझ्या विद्यार्थ्यांनी मला जेवढे शिकविले तेवढे कोणीच शिकवू शकले नाही. त्यांचा जीवन प्रवाह समृद्ध करण्याच्या प्रामाणिक प्रयत्नात माझा जीवन प्रवाह त्यांनी खूपच समृद्ध, परिपक्क आणि विस्तारित केला.”** हे मंगेश ढेंगे या शिक्षकाचे वाक्य मनात ठसवत आमचा परतीचा प्रवास सुरू झाला.



विद्यार्थ्यांसह श्री मंगेश ढेंगे सर

Link-https://cutt.ly/gzhuso3 link - https://cutt.ly/Mzhu23a

• **<u>चिंतनात्मक प्रश्न -</u>**

1. श्री मंगेश ढेंगे गुरूजींच्या प्रयोगशाळेतील आपणांस भावलेला एक प्रसंग / अनुभवाचे सकारण स्पष्टीकरण द्या.

2. आपली नोकरी औपचारिकता नसून ती आनंदाचे निधान व सृजनशीलतेची प्रयोगशाळा आहे असे ब्रीद आपणही मानत असाल तर आपल्या शाळेत जीवनकौशल्ये रूजविण्यासाठी कोणकोणते प्रयोग राबवाल?

3. जीवन कौशल्ये रुजवणुकीसाठी अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन, मूल्यमापन यासाठी कोणत्या छोटया - छोटया कृती वा उपक्रम वर्गात राबवाल त्याची यादी करा.

4. Leader by position पेक्षा Leader by action साठी नेतृत्वाला कसा वेगळा विचार करावा लागतो, ते नेतृत्व क्षमता, कौशल्यांच्या आधारावर पटवून दया.

• **<u>विचार करू, चर्चा करू</u>**

1. एका गावात 100% फासेपारधी समाजाचे लोक वास्तव्य करतात. तेथील पालक मुलांना शाळेत पाठवायला तयार नाहीत. शिक्षणाचा अभाव तरीही उत्पन्न चांगले अशी आर्थिक स्थिती. स्वच्छता विषयक मूलभूत मूल्ये रुजविणेही अवघड. शिक्षण सोडून इतर बाबतीत तरुण मुला-मुलींना आवश्यक वाटणारे स्वातंत्र्य दिले जाते. शाळेत प्रवेश, नियमितता, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी तुम्ही त्या शाळेत रुजू झालात तर कोणते उपक्रम राबवाल?

2. तुम्ही शिक्षित, सधन 3000 लोकवस्तीच्या गावात उपशिक्षक म्हणून रुजू झालात. गावातील विद्यार्थी शाळेत येतात परंतु गावात जात धर्मावरून गट आहेत, ग्रामपंचायत निवडणुका संवेदनशील वातावरणात होतात, पालक-विद्यार्थी संवाद नाही, शाळा व्यवस्थापन समितीचे सहकार्य नाही, मुलांवर याचा परिणाम होऊन संस्कार नाही, असे आपणास वारंवार वाटते. कारण मुले चोरी करतात, खोटे बोलतात, भांडण करतात, त्यांचे अभ्यासात मन रमत नाही, उपक्रमात सहभागी होण्याचा कंटाळा करतात. अशावेळी तुम्हाला मूल्ये, जीवन कौशल्ये रुजविणे अवघड वाटते. एक शिक्षक म्हणून कोणत्या छोट्या-छोट्या कृतींमधून मूल्यांसह जीवनकौशल्ये रुजवाल?

• **फासेपारधी बहुल भागातील शाळेसह प्रत्येक शाळेत जीवनकौशल्ये रुजवणुकीसाठी खालील बाबी करता येतील.**

1. शिक्षकांनी पाठाचे अध्ययन अनुभव देताना आशयापेक्षा निष्पत्तीवर भर दयावा.

2. प्रश्नोत्तरे, उत्तीर्ण – अनुत्तीर्ण या संकल्पनांपेक्षा मुलांच्या शिकण्यावर भर देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करा.

3. पाठय घटकातील आशयातून जीवनकौशल्ये रूजविण्यासाठी छोटया - छोटया कृती वा उपक्रमांची हेतुपुरस्सर आखणी; आठवडी, मासिक, वार्षिक नियोजनात करा.

4. जीवन कौशल्यांवर आधारित सर्व विषयांमधील निवडक घटकांवर नमुना पाठ तयार करा.

5. जीवनावश्यक कौशल्यांबाबत विद्यार्थ्यांकडून 10 वाक्ये लिहून घ्या. उदा. स्व ची जाणीव निर्माण होण्यासाठी '**मी असा आहे**' याबाबत दहा वाक्य लिहून घ्या. त्या वाक्यांत जी जीवनकौशल्ये दिसतात, ती विद्यार्थ्यांना समजावून दया.

6. पाठ अध्ययन सुरू असताना विद्यार्थ्यांचे निरीक्षण करून आकारिक मूल्यमापनातील कच्च्या नोंदी ठेवा. दैनंदिन निरीक्षण, तोंडी काम, उपक्रम ही साधन तंत्रे वापरून विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करा.

7. वर्गामध्ये छोट्या छोट्या समस्यांची निर्मिती करून त्यावर उपाय म्हणून विद्यार्थ्यांकडून भूमिकाभिनय करून घ्या.

8. वर्गातील ज्ञान केवळ पुस्तकी न राहता, जीवनात तोंड द्याव्या लागणाऱ्या विविध समस्यांचा सामना कसा करता येईल या बाबत मदत, समुपदेशन, सुलभीकरण करून मेंटॉरच्या भूमिकेत काम करा.

9. विद्यार्थ्यांना अध्ययनात मुक्तोत्तरी, चिंतनात्मक प्रश्न विचारा.

10. परिस्थितीची जाणीव करून घेऊन, योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित करण्यासाठी वर्गात प्रसंग वा केसस्टडी घेऊन चर्चा घडवून आणा.

11. एखादी कृती वा विचार, पारंपरिक पद्धतीने मांडण्या ऐवजी त्यात नावीन्य, सोपेपणा, निर्माण करण्यासाठी विविध प्रसंग निर्मितीतून वेगळेपणाने मांडा.

12. परिसरात घडलेली घटना, कृती कशाप्रकारे घडते याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना द्या. त्या आधारे विचार करून तर्क व अनुमान काढून निष्कर्ष काढण्याची क्षमता विकसित करण्यासाठी वर्गात चर्चा घ्या.

13. इतरांबद्दल द्वेष, मत्सर, दूषित विचार न ठेवता आदर, प्रेम, समान अनुभूती बाळगून समाजासाठी हितकारक कृती करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्यासाठी विद्यार्थी सहभागाचे छोटे - छोटे व्हिडिओ तयार करा आणि गटचर्चा घडवून आणा.

14. वर्गात गटपद्धतीने चर्चेसाठी प्रश्न, परिदृश्य निर्मिती, निष्पत्ती, संसाधने, कृती, संदेश, अनुभवांवरून उदाहरणे यांना स्थान द्या.

• **फासेपारधी बहुल भागात जीवन कौशल्ये रुजवणुकीत नेतृत्वाची भूमिका या मोडयूलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून उपयुक्तता** -

महाराष्ट्रातील सुमारे 1/3 इतक्या डोंगरी भूभागात बहुसंख्य आदिवासी वस्ती करून राहतात. या वस्त्यांमध्ये भौगोलिक दृष्ट्या साम्य दिसत असले, तरी भाषिक, सामाजिक ,आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिकदृष्ट्या विविधता दिसून येते. खरेतर प्रत्येक बालकाला शिक्षणाचा हक्क प्राप्त करून देण्यासाठी आजही अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अशा पार्श्वभूमीवर विद्यार्थी शाळेत येणे, टिकविणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण घेत असताना जीवन कौशल्यांची  रुजवणूक करणे हे मोठे आव्हान नागरी, ग्रामीण भागासह आदिवासी, फासेपारधी बहुल भागात जिकिरीचे आहे.प्रस्तुत मोडयूल मधील शालेय नेतृत्वाने केलेल्या अव्दितीय कार्यामुळे शिक्षक -मुख्याध्यापक यांना जीवन कौशल्ये, मूल्यांच्या रुजवणुकी बाबत मदत, समुपदेशन, सुलभीकरण व मेंटरिंग होईल असा विश्वास वाटतो. त्यामुळे

1) जर शिक्षकांनी वर्गात एकात्मिक पद्धतीने विद्यार्थी केंद्रित व कृतियुक्त उपक्रमांचा आधार घेत सहभागपूर्ण अध्ययन प्रक्रिया केली, तर वर्गातील शैक्षणिक वातावरण जीवन कौशल्ये रुजविण्यास अधिक पोषक होते हे यशोगाथा वाचल्यावर पटेल.

2) वरील नेतृत्वाचा अभ्यास केल्यानंतर जीवन कौशल्यॉंचे शिक्षण म्हणजे जीवन यशस्वी करण्याचे कौशल्य आहे असा विश्वास शिक्षक, मुख्याध्यापक यांच्यामध्ये रुजेल; जेणेकरून विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासासाठी विविध कृती, उपक्रम, अध्ययन-अध्यापन प्रक्रियेच्या माध्यमातून राबविता येतील.

3) शाळेने विद्यार्थ्यांमध्ये, गावात, समाजात केलेले बदल शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनी अनुभवले, तर पालकांचा प्रत्यक्ष सहभाग असलेल्या समित्या शाळांना प्रभावीपणे जीवनकौशल्ये विषयक उपक्रम राबविण्यास सर्वतोपरी मदत करतील.

4) केवळ फासेपारधी बहुलच नव्हे, तर सर्वच शाळांतील शिक्षकांना शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांसाठी विशेष प्रयत्न कसे करावेत याची दिशा या नेतृत्वाच्या अभ्यासाने शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येक घटकाला मिळेल.

5) शाळेत प्रवेशित होणाऱ्या प्रत्येक बालकाच्या शक्ती आणि क्षमतांचा विकास कसा करावा, शिक्षण प्रक्रिया परिणामकारक कशी करावी याबद्दलचा ऊहापोह होऊन केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक यांचे या बाबतीतले नेतृत्वाचे कौशल्य वाढीला लागेल.

• **<u>राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने शिक्षक आणि विद्यार्थी तथा जीवन कौशल्यांच्या शिक्षणाच्या संदर्भाने केलेला विचार</u>**

1) शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या जीवनातील सर्व अंगे आणि क्षमतांचा संयुक्तिक विकास होण्यासाठी अभ्यासक्रमांमध्ये मूलभूत कला, हस्तकला, मानवविद्या, खेळ, क्रीडा, स्वास्थ्य , भाषा, साहित्य, संस्कृती आणि मूल्य यांचा समावेश असला पाहिजे. अर्थात चारित्र्य निर्माणासह विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता, तर्कबुद्धी, अनुकंपा, संवेदनशीलता निर्माण केली पाहिजे. **याचा विचार करता विद्यार्थ्यांना माणूस म्हणून घडविताना शाळांमधून जीवन कौशल्ये महत्त्वाची वाटतात.**

2) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सृजनात्मक क्षमतेच्या विकासासह साक्षरता आणि संख्या ज्ञान या मूलभूत क्षमतांबरोबरच चिकित्सक विचार, समस्या निराकरण यांसारख्या उच्चस्तरीय बौद्धिक क्षमतांचा तसेच सामाजिक, भावनिक क्षमता आणि प्रवृत्ती यांचा विकास झाला पाहिजे ही तत्वे धोरणात आहे. **प्राथमिक स्तरातील शिक्षणामध्ये जाणीवपूर्वक उच्चस्तरीय बौद्धिक क्षमतांसाठी अभ्यासक्रमात निरनिराळया मूल्यविषयक कृती घ्याव्या लागतील.**

3) नवीन शैक्षणिक धोरणात सर्व परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाणे आवश्यक आहे. यासाठी ऐतिहासिक दृष्टीने उपेक्षित, वंचित, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. **परिणामी आजही प्रत्येक मूल शाळेत प्रवेशित होऊन गुणवत्तेने शिकण्यासाठी प्रशासन व शैक्षणिक संस्थांना सक्षम व्हावे लागेल.**

4) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये मानसिक सुरक्षा व समुपदेशन या अंतर्गत शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या भावना प्रकटीकरणाला महत्त्व देण्यात आले आहे. या पद्धतीच्या शिक्षण रचनेत विद्यार्थ्यांच्या मनावरील ओझे कमी होणे, तसेच शिक्षक-पालक संबंधात सुधारणा होणे अपेक्षित आहे. त्यासाठी शिक्षणातून प्रामाणिकपणा, माणुसकी, निष्ठा, संयम, धैर्य, न्याय, विवेक, दीर्घोदयोग, तर्कसंगत विचार, करुणा, सहानुभूती, साधेपणा, नम्रता, नीतिमत्ता, चारित्र्य या गुणांचा परिपोष  व संप्रेषण, सहकार्य, संघकार्य, लवचिकता अशा जीवन कौशल्यांवर भर असावा असे अपेक्षित आहे. **मुलांमधून नकारात्मक वृत्ती, हिंसा, आत्महत्या यां विषयीचे विचार दूर करण्याचे सामर्थ्य जीवनकौशल्यांमध्ये आहे.**

5) भारतीय दृष्टिकोनानुसार शिक्षणात भारतीय जीवनदृष्टी आणली पाहिजे. त्यात सत्य, प्रकृती नियम, कर्तव्यपालन, मनावरचा ताबा, नीतिनियम, क्षमा, तृप्ती, सदाचार, नि:स्वार्थीपणा, पावित्र्य, क्रोधावर विजय, इंद्रिय निग्रह, निरोगीपणा, अहिंसा, दातृत्व, दीन दुबळयांना मदत, यासाठी जर शिक्षणातून दृष्टिकोणाचा परिपोष झाला तर राष्ट्राला एक निरोगी व सक्षम नागरिक मिळेल जेणेकरून सामाजिक जीवनमूल्यांचे काम सोपे होईल असा विचार करण्यात आला आहे. **राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने जीवन कौशल्ये विकसित करून, सकल समाज सुदृढतेची कामना शिक्षणातून व्यक्त केली आहे. म्हणून जीवनकौशल्यांच्या रुजवणुकीचा मार्ग सांगणारे हे मोडयूल शिक्षण प्रवाहात मैलाचा दगड ठरेल असा विश्वास वाटतो.**

**समारोप**

आज समाजामध्ये जीवन आणि शिक्षण यांत फारकत होत असून, सर्व स्तरांवरून शिक्षण पद्धतीवर आरोप केले जातात. त्यासाठी शाळामधील शिक्षणातून आयुष्यात सक्षमपणे जगण्यासाठी जीवन कौशल्यांचा विकासावर भर देणे आवश्यक आहे.  हे सर्व शाळेतच अनेक विषयांतून एकात्मिक पद्धतीने होऊ शकते. त्यासाठी शिक्षकांनी कौशल्य विकसित करण्यावर भर दिला पाहिजे. खरे तर मुले नैसर्गिकरीत्या हे आत्मसात करण्यासाठी सक्षम असतात. त्यासाठी वर्गावर्गातून जीवन कौशल्यांची रुजवणूक केल्यास मुलांमध्ये समजूतदारपणा, शांतता, सहनशीलता वाढेल व इतरांशी मैत्रीपूर्ण संबंध अशी मूल्ये विकसित होतील. परिणामी विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीने जीवन जगण्याची कला विकसित होईल. आजच्या स्पर्धात्मक जगामध्ये विविध आव्हानांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य जीवन कौश्ल्यांच्या शिक्षणातूनच मिळणार आहे. आपण सर्व शिक्षकांनी जर प्रत्येक क्षण आनंदाचा आहे, जगणे सुंदर आहे या गोष्टी प्रत्यक्षात शाळेत आणल्या, तर शाळा समाजात जाईल आणि समाज शाळेत येईल.  फासेपारधी बहुल भागात

स्वयंप्रेरणेने यशस्वी कार्य करणारे श्री. मंगेश ढेंगे यांच्यासारखे अनेक शिक्षक, मुख्याध्यापक आपल्या राज्यात काम करीत आहेत. या कार्यापासून प्रेरणा घेऊन जीवन कौशल्ये रुजवणुकीत सहभागी व्हावे हीच या निमित्ताने अपेक्षा आहे.

**संदर्भ सूची**


1) जीवन कौशल्ये शिक्षण- शिक्षक मार्गदर्शिका जीवन कौशल्ये आणि नमुना पाठ [ भाग पहिला], महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,पुणे 30 (विद्या परिषद) प्रथम आवृत्ती -जून 2011

2) जीवन कौशल्ये शिक्षण - शिक्षक मार्गदर्शिका - अध्ययन - अध्यापन पद्धती आणि मूल्यमापन [भाग दुसरा] महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे 30 (विद्या परिषद) प्रथम आवृत्ती- जून 2011

3) जीवन कौशल्ये शिक्षण विद्यार्थी कार्य पुस्तिका महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे 30 प्रथमावृत्ती मार्च 2013

4) जीवन कौशल्ये शिक्षण प्रशिक्षण घटक संच, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे 30 विद्या परिषद प्रथमावृत्ती- जून 2011

5) जीवन कौशल्ये हस्तपुस्तिका प्राध्यापक राम गायकवाड,राज्य साधन केंद्र पुणे,पहिली आवृत्ती जानेवारी 2005-06

6) जीवन कौशल्ये प्रशिक्षण घटक संच -महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) पुणे प्रथम आवृत्ती - मार्च 2013

7) निपुण ( रौप्यमहोत्सवी वर्षपूर्ती स्मरणिका 2020) महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशिक्षण संस्था, (मिपा) औरंगाबाद

8) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आराखडा व मसुदा.

9) शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम, पूरक वाचन साहित्य जानेवारी 2018 संचालक महाराष्ट्र विद्या प्राधिकरण पुणे.

10) निष्ठा, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार, डिसेंबर- 2019 संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे.

11) http://mr.vikaspedia.in/Learning-resources


Drive Folder link- https://bit.ly/3qK8ziE


**मोड्यूल विकसक**

डॉ.मंजूषा क्षीरसागर,
वरिष्ठ अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
जळगाव

**समन्वयन**

डॉज्योती कुलकर्णी.
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था ,(मिपा)औरंगाबाद

**मार्गदर्शक**

डॉनेहा बेलसरे.
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था ,(मिपा)औरंगाबाद